Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २५ • Title - Code :- MAHMAR4951 • गुरुवार दि.१२ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# वेळेपूर्वीच उघडतात वरोरा शहरातील दारु दुकाने!

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचा भोंगळ कारभार

**वरोरा । प्रतिनिधी-दारूच्या नशेत युवा पिढी उद्ध्वस्त होत असतानाही निव्वळ महसूल मिळतो म्हणून राज्य शासनाकडून स्वत:च बनवलेल्या नियमांना पायदळी तुडवले जात असल्याचे चित्र वरोरा शहरात दिसून येत आहे. येथील विदेशी दारूची दुकाने सकाळी ११.३० वाजल्यानंतर व देशी दारूची दुकाने सकाळी ८ वाजता उघडण्यात यावीत असा शासकीय नियम आहे. प्रत्यक्षात मात्र ही दुकाने सकाळी नियोजित वेळेपेक्षा लवकर उघडण्यात येत असल्याने स्थानिक पातळीवरील राज्य उत्पादन शुल्क विभागाची अकार्यक्षमता दिसून येत आहे. दारू दुकानदारांशी असलेल्या आर्थिक संबंधांचा परिणाम असावा का? नियमानुसार आपली कर्तव्ये पार पाडावी असे या विभागातील अधिकाऱ्यांना का वाटत नसावे? असे प्रश्न शहरातील चौकाचौकात खमंगपणे चर्चिले जात आहेत.**

वरोरा शहरात अगदी सकाळपासूनच राजरोसपणे दुकाने उघडून मद्याची विक्री केली जात असल्याचे नागरिक उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. सामान्य नागरिकांना कायद्याचा धाक दाखवणारे स्थानिक पोलिस मात्र दारू दुकानांविरोधात कारवाई करताना मूग गिळून गप्प कसे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वेळीअवेळी उघडण्यात येणारी ही दुकाने सामान्य नागरिकांना मनःस्ताप देत आहे. महिला व लहान बालकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे . उत्पादन शुल्क विभागाच्या कायद्यांना मूठमाती दाखविण्याचे काम बार मालकांकडून केल्या जात असताना हा विभाग कोणत्या मजबुरीने शांत बसून आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी व्हायच्या अगोदर शहरात मोजकीच दारू दुकाने होती .पण गेल्या वर्षभरात हा आकडा दुप्पट झाला. वरोरा शहरात आधी बारची संख्या १७ होती. आता त्यात आणखी नवीन १७ बारची भर पडली आहे. त्याचप्रमाणे बियर शॉप पूर्वी ४ होते. त्यात १० नवीन बियर शॉपीची भर पडली आहे . देशी दारू विक्रीचे पूर्वी ५ दुकाने होती.आणखी नवीन १ दुकान तयार झाले आहे . तर शहरात पूर्वी २ वाईन शॉप होते . एक कायमचे बंद झाल्याने सध्या स्थितीत एक वाईन शॉप सुरु असून लवकरच नवीन २ दुकाने सुरु होणार असल्याचे बोलल्या जात आहे . मागेल त्याला शेततळे या योजनेसारखे मागेल त्याला दारू विक्रीचा परवाना शासनाने सुरु केल्याने ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे . त्यामुळे विक्रीवर परिणाम झाल्याने कायद्याला पायदळी तुडवत दारू विक्री सुरु आहे. हा प्रकार राजरोसपणे सुरु असतांना स्थानिक उत्पादन शुल्क विभाग आंधळ्याचे सोंग घेऊन गप्प बसला आहे .

### या कायद्यान्वये होते कारवाई

**देशी-विदेशी मद्य विक्रेते, हॉटेल्स, परमीटरूम-बिअरबार चालकांना शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अनुज्ञप्ती आवश्यक असते. दुकान सुरू करताना अनुज्ञप्तीधारक विक्रेत्यांना विविध अटी व शर्ती लागू करण्यात येतात. यात दुकान उघडण्याच्या वेळा ठरवून दिल्या आहेत, त्याचबरोबर विक्रेत्यांना दररोजचा मद्याचा उपलब्ध साठा, विक्रीच्या नोंदी ठेवणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्याचबरोबर वयाने सज्ञान असलेल्यांनाच मद्य विक्रीचा आणि मद्य पिण्याचा परवाना असणार्यांना हॉटेलमध्ये मद्य पिण्यासाठी बसू देण्याचा नियम आहे. अशाप्रकारचे उल्लंघन करणार्या दुकानांवर मुंबई दारूबंदी कायदा कलम १०४ अन्वये आणि अनुज्ञप्ती शर्थींचे उल्लंघन केल्याच्या अंतर्गत कारवाई करण्यात येते. त्यानंतर जिल्हाधिकार्यांकडे कारवाईचा प्रस्ताव सादर करून त्यांच्या मंजुरीनुसार दंडात्मक कारवाई केली जाते.**



### आनंदवन चौकातही चालते मद्यविक्री

वरोरा शहर विद्येचे माहेरघर म्हणून पंचक्रोशित प्रसिद्ध आहे.शैक्षणिक क्षेत्रात या शहराला नावलौकिक आहे. या विद्येच्या माहेरघराला कलंकित करण्याचे काम काही पांढरपेशांकडून केल्या जात असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे .एकीकडे वरोरा शहरातील आनंदवन परिसर एज्युकेशन हब म्हणून नावारूपास येत आहे तर दुसरीकडे याला कलंकित करण्याकरिता काहींनी नवनवीन मद्य विक्री केंद्र उभारायला सुरवात केली आहे. . जागतिक पातळीवर प्रसिद्ध समाजसेवक स्वर्गीय बाबा आमटेंच्या सेवा,समर्पण साधनेने पुनीत झालेल्या आनंदवनाची सातासमुद्रापार ख्याती आहे . दररोज देशविदेशातील पर्यटक आनंदवनास भेट देत असतात.तसेच हा परिसर सदैव विद्यार्थ्यांनी गजबजलेला असतो. या चौकाला आता ग्रहण लागणार असून बस थांब्याच्या अगदी मागे नवीन दारू दुकान सुरु झाल्याने जोरजोरात शिवीगाळ व बेवड्यांचा गोंधळ सुरू असते. याचा त्रास विद्यार्थिनींना व प्रवाश्यांना होत आहे.

| अ. क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार | अनुज्ञप्तीची नियमानुसार विहित वेळ | मद्यविक्रीची कालावधी व मद्यविक्रीची पध्दत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | एफएल-III व एफएल-IV | सकाळी ११.३० ते रात्री ११.३० | सर्व दिवस अनुज्ञप्ती उघडण्याचे विहीत वेळेपासून सकाळी ११.३० ते रात्री ११.३० पर्यंत पूर्ण क्षमतेने |
| २ | एफ.एल.II/ सीएलएफएलटिओडी-III एफएलबिआर-II | सकाळी १०.०० ते रात्री १०.३० | सर्व दिवस अनुज्ञप्ती उघडण्याचे विहीत वेळेपासून ते सकाळी १०.०० रात्री १०.३० वाजेपर्यंत काऊंटर विक्री सिलबंद बॉटलीतुन |
| ३ | सी.एल.III | सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० | सर्व दिवस अनुज्ञप्ती उघडण्याचे सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत काऊंटर विक्री पुर्ण क्षमतेने |
| ४ | एफ.एल-I (विदेशी मद्याचे ठोक विक्रेते) व | एफ.एल-I सकाळी १०.०० ते रात्री ०८.०० | एफ.एल-I अनुज्ञप्ती कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० वेळेपासून ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत |
| ५ | सिलएल-II (देशी मद्याचे ठोक विक्रेते) | सिएल-II सकाळी ०९.०० ते रात्री ०८.०० | सि.एल.II अनुज्ञप्ती कामकाजाच्या दिवशी सकाळी ०९.०० वेळेपासून ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत |

### अवैद्य दारूविक्री जोमात

**ज्याप्रमाणे परवानाधारक दारु विक्रेते कायद्याला मूठमाती दाखविण्याचे कार्य करत आहे . त्याचप्रमाणे शहरात विविध भागात अजूनही अवैध दारू विक्री सुरु आहे. शहरातील आनंदवन , एपीजे अब्दुल कलाम चौक (रत्नमाला चौक ) नवीन वस्ती , तसेच शहरातील इतर ठिकाणी कुठलीही भीती न बाळगता राजरोसपणे दारूविक्री सुरु असून स्थानिक राज्य उत्पादन शुल्क व पोलिसांचे याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष सुरू आहे. यामुळे भविष्यात एखादा विपरीत प्रसंग घडल्यास जबाबदार कोण असेल याचाही विचार व्हायला पाहिजे.**



# साठ लाखांच्या निधीतून होणार सिमेंट रस्त्याचे बांधकाम

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचगुंडी ग्रामपंचायत अंतर्गत समाविष्ट कोत्तुर येथे साठ लाखांच्या निधीतून सिमेंट कॉंक्रेट रस्त्याचे बांधकाम होणार असून नुकतेच माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



कोत्तुर येथील सुरेश रामगिरी यांच्या घरापासून ते मोंडी गोलेंटी यांच्या घरापर्यंत कच्चा रस्ता असल्याने पावसाळ्यात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य होत होते.या प्रभागातील नागरिकांनी सिमेंट रस्ता बांधकाम करून देण्यासाठी मागणी केली होती. या प्रभागातील नागरिकांची अडचण लक्षात घेता माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे सदर मागणी रेटून धरली.अखेर ती मागणी मंजूर झाली असून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून हे काम पूर्ण केले जाणार आहे. अंदाजपत्रकानुसार तब्बल ६० लाख रुपयांच्या निधीतून हे काम पूर्ण केले जाणार आहे.नुकतेच माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते सदर सिमेंट कॉंक्रेट रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले असून या प्रभागातील नागरिकांची मोठी अडचण दूर झाल्याने त्यांनी भाग्यश्री आत्राम यांचे आभार मानले. या भूमिपूजन सोहळ्याला सरपंच कमला बापू आत्राम,रा.कॉ.पार्टीचे अहेरी तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार,नगरसेवक अमोल मुक्कावार,मखमुर शेख, रामू कस्तुरवार, बिच्चु मंचालावार, बापू गानालावार, शंकर बाकोलू, रामन्ना कस्तुरवार, तिरुपती पालेवार,राजू आत्राम, राजाराम कुमरे, राकेश गानालावार, विनोद देवरवार, गागुबाई कंपेलवार, हरीश येमुलवार आदी गावकरी उपस्थित होते.

# पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी केली मानसिक आजाराबद्दल जनजागृती

## जागतिक मानसिक आरोग्य दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा । प्रतिनिधी**

१० ऑक्टोंबर रोज मंगळवारला जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा येथे जागतिक मानसिक आरोग्य दिवस निमित्त निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी डॉ. सचिन तडस, प्रमुख पाहुणे डॉ. हरले , डॉ. अनिल वानखेडे , डॉ. केवल शेंडे , यांची उपस्थिती होती.



उपस्थित मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरले यांनी केले. जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी डॉ. सचिन तडस यांनी मानसिक आजारांबद्दल व जागतिक मानसिक आरोग्य दिन याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच त्यानंतर डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा. विशेषीकरण मानसोपचार सेवा क्षेत्र अंतर्गत जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा येथे विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. पायल डाहारे, पायल राऊत, पायल गुजरकर, काजल मोरे, निकिता लोखंडे, प्रांजली थूल, अंकिता मगरदे, प्रतीक्षा घवघवे ,मोहित कांबळे यांनी सादर केले. पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये मानसिक आजारांबद्दल अंधश्रद्धा न बाळगता वैज्ञानिक दृष्टिकोन पाळणे हा संदेश दिला. डॉ. वैशाली झाडे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## शब्द वेध

### माणूस

**माणसाला माणूस म्हणण्याच्या**
**लायकीचा माणूस मफमुळी**
**राहिला नाही......**
**तंत्र ज्ञानामुळे झाली प्रगती जरी,**
**कधी जाळेल भस्मासूर अवनीला**
**विश्वास ही तो राहिला नाही !**
**म्हणेल पुढची पिढी माणसांना**
**दाखवा मज मूळ माणूस**
**अजूनही मी तो**
**पाहिला नाही...!!**



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

# अमृत कलश यात्रेअंतर्गत जि.प.च्या वतीने सायकल व बाईक रॅली

**गडचिरोली । प्रतिनिधी**

'मेरी माटी मेरा देश' अर्थात माझी माती माझा देश' या कार्यक्रमांतर्गत संपूर्ण देशभरात अमृत कलश यात्रा काढण्यात येत आहे.जिल्हा परिषद, गडचिरोलीच्या वतीने या उपक्रमानिमित्त जिल्ह्यातही दिनांक १ सप्टेंबर ते १३ ऑक्टोबरपर्यंत सर्व गाव, तालुके व जिल्हास्तरावर अमृत कलश यात्रा काढण्यात येत आहे. ०९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता गांधी चौक ते जिल्हा परिषद प्रांगणापर्यंत अमृत कलश यात्रा अंतर्गत सायकल व बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीचे नेतृत्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी सुद्धा सायकल चालवत त्यांची साथ दिली. रॅली मध्ये जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख व कर्मचारी सायकल व बाईक वर सोबत होते तर पंचायत विभागाचे प्रमुख उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कणसे यांनी स्वतः अमृत कलश हाती घेतला.या सायकल रॅली मध्ये जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजकुमार निकम यांच्या सोबत शाळेच्या मुला-मुलींनी सुद्धा उत्स्फुर्तपणे आपला सहभाग नोंदविला. त्यांच्या देशभक्तीपर घोषणांनी सारा आसमंत दणाणला. सदर रॅलीचा समारोपीय कार्यक्रम जिल्हा परिषद प्रांगण येथे पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन पंचायत विभागाचे अधिकारी रविंद्र कणसे व वि . एस. टी . एफ चे जिल्हा कार्यकारी प्रशांत कारमोरे यांनी केले.



# किसानपुत्र नरेंद्र जीवतोडे यांचा ग्रामगीता देवून वाढदिवस साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

किसानपुत्र नरेंद्र जीवतोडे यांचा ४८ वा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.अंकुश आगलावे यांनी हनुमान मंदीर नंदोरी येथे ग्रामगीता,भगवी टोपी देवून दीर्घायुषाच्या हार्दीक शुभेच्छा दिल्या.

किसानपुत्र व शेतकऱ्यांचा नेता म्हणून ओळख असलेले नरेंद्र जीवतोडे यांना वरोरा विधानसभा क्षेत्राचे भावी आमदार करण्याचा संकल्प यावेळी भाजपा पदाधिकारी यांनी घेतला. यावेळी डॉ. आगलावे यांनी नरेंद्र जीवतोडे यांचा सामाजिक कार्याचा आढावा घेत त्यांनी समाजपयोगी केलेले कार्य सांगितले.नरेंद्र जीवतोडे यांनी पिवळा मोजॅक सोयाबीन रोगसंबंधी पायदळ यात्रा काढून शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळण्यास प्रयत्न केले. शेतकऱ्यांना २४ तास विद्युत सेवा उपलब्ध होण्यास आंदोलन केली. अनेक कृषी मेळावे घेतले.आदर्श गाव कसे करता येईल यासंबंधी





अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना नंदोरी येथे पाचारण केले. शासनाने दिलेल्या निधी वेळोवेळी उपयोग शेतकऱ्यांच्या हितासाठी केले असे अनेक सामाजिक कार्य जीवतोडे यांचे नेतृत्वात झाले आहे आणि भविष्यात होत राहणार असे डॉ. आगलावे यांनी सांगितले.यावेळी सर्वश्री भगवान गायकवाड, नारायण वरारकर, मधुकर टिपले, सुरेश महाजन, आकाश वानखेडे, बहादे, गुड्डू एकरे, हॅन्डसनराव, घाटे, भाजपा पदाधिकारी, व ग्रामस्थ उपस्थित होते .

# दिव्याखाली अंधार

**५ ऑक्टोबरला गडचिरोली जिल्ह्यातील गुंडेनूर गावातील पुंगाटी नामक पन्नास वर्षीय इसमाचा आजाराने मृत्यू झाला. भामरागडच्या ग्रामीण रुग्णालयातून त्यांच्या स्वगावी जाताना रस्त्यात नाला आहे. त्यात पाणी असल्याने नाला पार करण्यासाठी खाटेवर झोपवून न्यावे लागले. या रस्त्यावर पूल नसल्याने आदिवासी बांधवांची विशेषत: पावसाळ्यात मोठी गैरसोय होत आहे. भामरागड तालुक्यातील गावांना आजही जगण्यासाठी साध्यासाध्या सुविधांसाठी या भागातील आदिवासींना संघर्ष करावा लागतो.**




१५ ऑगस्ट,१९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. इंग्रजांच्या मगरमिठीतून आपण मुक्त झालो. त्याप्रित्यर्थ आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करीत आहो. एक भारतीय म्हणून अतिशय आनंदाची गोष्ट आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याची आपल्या पिढीला संधी मिळतेय, ऊर अगदी आनंदाने भरून आला. स्वातंत्र्याचा सूर्य बघता आला. आपण सगळे मुक्त श्वास घेत आहोत. सर्वत्र आनंदमय वातावरणाने परिसर दरवळून गेला आहे. कठीणात कठीण समजले जाणारे चंद्रयान चंद्रावर पोहचविण्यात आमचे शास्त्रज्ञ यशस्वी झाले. अशा एक ना अनेक सर्वांना अभिमानास्पद गोष्टी घडताहेत. मन प्रसन्न वाटतंय. भारतीय असल्याचा अभिमान वाटतो. विश्वगुरू होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे सर्वत्र आनंदमयी वातावरणाचा सुखद गारवा मनाला हुरळून टाकत असतानाच मनाला चटका देणारी एक बातमी वाचायला मिळाली. ती बातमी आहे, विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील. गडचिरोली हा चंद्रपूर जिल्ह्याचा बंधूजिल्हा असल्याने साहजिकच त्या बातमीकडे लक्ष वेधले गेले. बातमीत लिहिले आहे, नाला पार करण्यासाठी खाटेवरून नेला मृतदेह!

एकविसाव्या शतकात असे घडेल? विश्वास बसेना. त्या बातमीचे अधिक सविस्तर वाचन केल्यानंतर मन सुन्न झाले. कुठल्याही संवेदनशील मनाला बधिरता यावी अशीच ती बातमी आहे. त्या बातमीत लिहिल्याप्रमाणे, गुंडेनूर हे गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील गाव आहे. या गाव परिसरातील कटिया कारीया पुंगाटी या पन्नास वर्षीय रहिवाशाचा भामरागडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान ५ ऑक्टोबरला मृत्यू झाला. अंत्यसंस्कारसाठी तो मृतदेह त्यांच्या स्वगावी न्यायचा होता. तो नेण्यासाठी कुठलीही सोय नसल्याने आप्तेष्टांनी ट्रॅक्टरची सोय केली. तो मृतदेह गावाच्या दिशेने नेण्यात आला. गावात पोहोचण्यापूर्वी रस्त्यात एक नाला पडतो. त्या नाल्यातून कुठलेही वाहन नेणे अशक्य असल्याने नाल्यातील पाण्यातून पलीकडच्या तीरावर जाण्यासाठी अडचण आली.

नेहमीप्रमाणे त्यांनी पर्याय शोधला. तो म्हणजे एक खाट उपलब्ध केली गेली. या खाटेवर तो मृतदेह टाकून नाला पार केला. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला. गुंडेनूर सारख्या दुर्गम भागातील नागरिकांची व्यथा यानिमित्ताने समाजासमोर आली. भामरागड तालुक्याच्या बिनागुंडा परिसरातील अनेक गावे अजूनही बिकट अवस्थेत कशी जगत आहेत हे जगाला दिसले. एकीकडे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना दुसरीकडे याच देशातील अतिदुर्गम समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील गुंडेनूर सारख्या दुर्गम भागातील लोकांना त्यांच्या घरापर्यंत पोहोचण्यासाठी साधा रस्ता मिळू नये. मनाला क्लेश देणारी ही वार्ता आहे. नुसते ऐकूनही मन सुन्न व्हायला झाले. अमृत महोत्सवी वर्षानंतरही या गावांना अशा लहानलहान सुविधांपासून वंचित राहावे लागते. खरंच आम्ही प्रगतीच्या दिशेने आहोत काय? एकीकडे आम्ही देशात, देशाबाहेर प्रगतीचा आलेख उंचावत गेला असल्याचा भास निर्माण करतोय. प्रगती झाल्याचे वातावरण निर्माण करतो. शायनिंग इंडियाचे चित्र उभे उभारतो आणि दुसरीकडे आमच्या देशातील दुर्गम भागात जायला रस्तेच नाही. मृतदेह खाटेवर न्यावा लागतो. केवढी ही विपरीतता.सात दशकानंतरही आमच्या सरकारला या भागात रस्ता बांधावासा वाटू नये. पूल बांधावासा वाटू नये.आमचे शासन,प्रशासन किती लोकहितकारी आणि संवेदनशील आहे याची प्रचिती आली. या निमित्ताने या परिसरातील व्यथा समाजापुढे आली. आपण कुठे आहोत? आपले वास्तव काय आहे. वाचायला मिळालेली ही बातमी संवेदनशील मनाला वेदना देणारी आहे. माणूस म्हणून जगण्याचा सर्वांना अधिकार आहे.एके दिवशी सगळ्यांना मरणही येणार आहे. परंतु ज्या मरणयातना या परीसरातील आदिवासी बांधवांच्या वाट्याला आल्या तशा पुढे कुठल्याही बांधवांच्या वाट्याला येऊ नये. देशांतर्गत अशी परिस्थिती म्हणजे विकास कागदावरच झाला असून प्रत्यक्षात दिव्याखाली अंधारच अंधार आहे हे चित्र दिसते. अन्न, वस्त्र, निवारा आणि रस्ते या मानवी गरजा प्राधान्याने सोडवून दुर्गम भागातील लोकांनाही विकासाच्या मार्गावर आणले पाहिजे.यानिमित्ताने मानवतावादी दृष्टिकोन बाळगून सरकारने विकासाची गंगा खऱ्या गरजूंपर्यंत पोहचवली पाहिजे. शासनाने प्रामाणिक विचार केल्यास सहज शक्य आहे.नाहीतर मराठीमध्ये म्हण आहे, दिव्याखाली अंधार.

# शिक्षक भरतीसाठी नववर्ष उजाडणार! १८ जिल्ह्यांचीच बिंदु नामावली अंतिम; सोलापूर, पुण्यासह १० जिल्हे पिछाडीवर

**सोलापूर :** सात वर्षानंतर सुरु झालेली जिल्हा परिषद शाळांवरील २३ हजार पदांच्या शिक्षक भरतीची प्रक्रिया बिंदुनामावलीत अडकली आहे. सोलापूरसह पुणे, सांगली, सातारा अशा दहा जिल्ह्यांच्या बिंदुनामावलीत मागासवर्गीय कक्षाने त्रुटी काढल्या असून त्याच्या पूर्ततेसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे. या विलंबामुळे शिक्षक भरती पूर्ण होण्यासाठी २०२४ उजाडणार हे निश्चित झाले आहे.ग्रामविकास विभागाच्या जून २०२३मधील निर्णयानुसार आता नवीन शिक्षक भरतीत उतरलेल्या उमेदवारांना स्वयंघोषणापत्र बंधनकारक करण्यात आले. त्यानुसार ज्या जिल्ह्यांमध्ये त्याची निवड झाली आहे, त्यास निवृत्त होईपर्यंत तेथेच काम करावे लागणार आहे. दुसरीकडे खासगी अनुदानित संस्थांमध्ये शिक्षक नियुक्तीसाठी पवित्र पोर्टवरूच एका जागेसाठी तीन उमेदवार पाठविले जाणार आहेत.तत्पूर्वी, शिक्षक भरतीच्या प्रक्रियेतील टप्पे पार करताना १८ जिल्ह्यांचीच बिंदुनामावली अंतिम झाली आहे. अजूनही १० जिल्ह्यांची बिंदुनामावली त्रुटीत अडकली असून त्यासाठी नोव्हेंबर उजाडणार आहे. त्यानंतर १५ ते २० दिवसांची मुदत देऊन उमेदवारांना प्राधान्यक्रम निवडावे लागणार आहेत. डिसेंबर-जानेवारीत मेरिट यादी प्रसिद्ध होईल आणि पुढच्या वर्षी शाळा सुरु होतानाच हे नवीन शिक्षक संबंधित शाळांमध्ये रूजू होतील, अशी सद्य:स्थिती आहे.दरम्यान, कंत्राटी भरतीचा निर्णय हा कायमस्वरूपी नसून शासकीय भरती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून निवडलेला तो पर्याय असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.बिंदुनामावली निश्चित करून अंतिम मान्यतेसाठी मागासवर्गीय कक्षाकडून मंजूर करून घेण्यासाठी प्रस्ताव द्यायला काही जिल्हा परिषदांना विलंब झाला. आता पुन्हा त्यात त्रुटी आढळल्याने त्याची पूर्तता करायला वेळ लागत आहे. अद्याप सोलापूर, पुणे, सांगली, सातारा, ठाणे, जालना, बीड, लातूर, नांदेड, धाराशिव या १० जिल्ह्यांची बिंदुनामावली अजूनही अंतिम झालेली नाही. सर्व जिल्हा परिषदांमधील प्राथमिक शिक्षण विभागा बिंदुनामावली अंतिम झाल्यावरच शिक्षक भरतीला प्रत्यक्षात सुरवात होणार आहे.




## मोहोळ येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या निधीसाठी प्रयत्न करू – खासदार जय सिद्धेश्वर महास्वामी



**मोहोळ :** मोहोळच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धन होऊन उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर केल्याबद्दल खासदार जय सिद्धेश्वर महास्वामी यांनी महाराष्ट्र सरकारचे आभार मानत, पुढील काळात रुग्णालयात रूग्णांना चांगल्या सुविधा मिळतील असा विश्वास व्यक्त केला.खासदार महास्वामी यांनी आज मोहोळ येथील ग्रामिण रुग्णालयाला भेट देऊन कार्यकर्ते आणि रुग्णालयातील कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार यांच्याकडे भाजपच्या पदाधिकारी व नेत्यांनी वारंवार पाठपुरावा करून या रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनास मान्यता मिळवून घेतली असल्याचे सांगितले.मोहोळ येथील रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास होणार असून, मोहोळ रेल्वे स्थानकावर सिद्धेश्वर, चेन्नई-दादर एक्सप्रेस या गाड्यांना लवकरच थांबा मिळणार आहे. तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मी कटीबद्ध आहे. उपजिल्हा रुग्णालयाला लवकरात लवकर निधी मिळण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे खा महास्वामी यांनी सांगितले.यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, संजय क्षीरसागर, जिल्हाउपाध्यक्ष सतीश काळे,शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर, फंटू गोफणे, मधुकर पाटील,प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, तालुका सरचिटणीस महेश सोवनी, सतीश पाटील, मुजीब मुजावर, उपाध्यक्ष विनोद देशपांडे, सुशील मोटे ,गुरुराज तागडे ,धनंजय मोहोळकर, तानाजी बनसोडे ,पांडुरंग लेंगरे ,द्रोणा लेंगरे ,आदींसह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

## कुणाकुणाचा आवाज दाबणार?:सत्तेचा गैरवापर करून मुलभूत अधिकारही हिरावून घेणार का? कपटीपणा योग्य नाही–रोहित पवार

**मुंबई**–विरोधात व्हिडीओ टाकला म्हणून ट्रोल गँग वापरून ट्रोल करायचे, ट्विटरची ब्लू टिक काढायची, हे अत्यंत खालच्या पातळीवरचे राजकारण आहे. अशाप्रकारे कुणाकुणाचा आवाज दाबणार? इतका कपटीपणा योग्य नाही. प्रत्येकाला विचारधारेचे, आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे आणि मुलभूत अधिकारही आहे, परंतु सत्तेचा गैरवापर करून आपण हा मुलभूत अधिकारही हिरावून घेणार का? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान रोहित पवार यांनी ट्विट करत सरकारवर हल्लाबोल केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टोलमाफीबाबत माध्यमांसमोर केलेले विधान आणि प्रत्यक्षात मोठी विसंगती दिसून आली आहे. मनसेने पुन्हा एकदा टोलमाफीचा मुद्दा उपस्थित करत राज्य सरकारला धारेवर धरले आहे. याच दरम्यान टोलमाफीच्या या मुद्द्यावर अभिनेत्री तेजस्विनी पंडितने थेट भूमिका घेतल्याचे दिसून आले. मात्र, तिने भूमिका घेतल्यानंतर तिच्या ट्विटर अकाऊंटची ब्लू टिक काढून टाकण्यात आल्याचा आरोप अभिनेत्रीने केला आहे.तेजस्विनी पंडितने यानंतर कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा राहात नाही, असे म्हणत सरकारला लक्ष्य केले आहे. माझ्या द अकाऊंटचे व्हेरिफिकेशन काही लोकांनी माझे स्पष्ट मत सहन न झाल्याने राजकीय दबाव टाकून काढून टाकण्यास सांगितले आहे. कारण का



तर मी एक आम्हा जनतेची इतकी वर्ष फसवणूक झाली असा वाटणारा प्रश्न उपस्थित केला म्हणून? द अकाउंटचा व्हेरिफिकेशन बॅच हा सन्मान असेल तर तो योग्य कारणासाठी जाणे, हा त्याहून मोठा सन्मान मला दिलात, त्याबद्दल धन्यवाद. पण बंदीने माझा काय किंवा सामान्य माणसांच्या मनातील आक्रोश कमी होणार नाही. सामान्यांचा आवाज बंद करणे हाच ह्यांचा बहुदा एकमात्र 'द' फॅक्टर आहे हे मात्र स्पष्ट होत जाईल. असो, माझा जय हिंद जय महाराष्ट्रसाठीचा घोष योग्यवेळी सुरूच राहील. सत्तेत कोणीका बसेना, आम्ही जनता आहोत! जेव्हा जेव्हा आमची पिळवणूक होईल, दिशाभूल होईल, तेव्हा तेव्हा आमचा आवाज दुमदूमणारच आहे! जय हिंद जय महाराष्ट्र! असे तेजस्विनी पंडितने आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

## उद्धव ठाकरे अन् शरद पवारांनी महाराष्ट्राचा जीव घेतला:आशिष शेलार



**मुंबई**–महाराष्ट्र आजही गुंतवणुकीत नंबर वन आहे. राज्याचा जीव उद्धव ठाकरे आणि काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने घेतला. त्यांनी राज्यातील उद्योग बाहेर काढले, नानारला विरोध केला, नवीन विमानतळाला विरोध करणारे देखील हेच आहेत, असा आरोप शेलार यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर केला आहे.दरम्यान आशिष शेलार म्हणाले की, पत्राचाळ घोटाळा करून आमचा पक्ष चालत नाही. कोविड खिचडी घोटाळा करून आमचा पक्ष चालत नाही. आम्ही आमच्या पक्षाच्या खर्चाचा हिशेब निवडणूक आयोगाकडे देत असतो, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे.भाजप आमदार तथा नेते आशिष शेलार पुढे बोलताना म्हणाले की, शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखे भारतात आणण्याचा तीन वर्षांचा करार करण्यात आला आहे. मुंबई, सातारा, नागपूर आणि कोल्हापूरमध्ये ही वाघनखे नेणार. राज्यात जे आजपर्यंत टवाळखोर होते पण आज ते शंकेखोर झाले. ज्यांनी प्रश्न उपस्थित केले त्या शंकाखोरांचा कोथळा आम्ही बाहेर काढणार आहोत. आम्ही वाघ नखांच्या निमित्ताने राहुल सोलापूरकर यांचे व्याख्यान आयोजित केले. ज्यांच्यात शंकेची कीड वळवळत आहे त्यानी या व्याख्यानाला यावे. आम्ही स्पष्टीकरण देत नाही तर सत्य मांडण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा टोला आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता लगावला आहे.आशिष शेलार म्हणाले की, मोहमद अली रोडवर जे उर्दू आणि पारशी बोर्ड आहेत ते तोडफोड करून दाखवा.त्या बोर्डांना कुणी काळे फासत नाही, काही जण आज गुजराती शब्दावर तोडफोड करत आहेत. हे केवळ विशिष्ट वर्गाची मते मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तर वाघ नखांवरील शंका उपस्थित करणाऱ्यांना इतिहास नको, वापरलेली वाघ नख नको हे सर्व नियोजित आहे. महाराष्ट्राची जनता पाहत आहे.

# रामपूर येथिल संदीप निमकरच्या तीन मारेकऱ्यांना अटक

**राजुरा । प्रतिनिधी**

रामपुर येथिल संदीप देवराव निमकर यांची (दि. ९) यांची हत्या करून आरोपी फरार झाले होते. घटनेची माहिती मिळताच काही तासामध्ये पोलिस तपास यंत्रणेने शोध घेत तीन मारेकऱ्यांना अटक केली आहे.शहरालगत असलेल्या रामपुर वस्तीत वॉर्ड क्रमांक दोन साई मंदिर जवळ राहत असलेला संदीप देवराव निमकर (वय २८) या युवकाची रामपुर जंगलात अज्ञात व्यक्तींनी दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना रोज मंगळवारला चार वाजता उघडकीस आली. संदीप निमकर हा आपल्या आई वडिलाना एकुलता एक मुलगा होता. (दि. ९) रोज सोमवारला रात्री आठ वाजता घरून निघून गेला तेव्हापासून घरच्यांनी शोधाशोध सुरू केली असता रामपुर लगत जंगलात झुडपामध्ये संदीप यांचा मृतदेह दिसून आला. ही माहिती राजुरा पोलिसांना मिळताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग



परदेसी यांच्या मार्गदर्शनात अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक रीना जनबंधू यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलिस अधिकारी दीपक साखरे व राजुरा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक योगेश्वर पारधी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह हत्याऱ्याचा तपास सुरू केला. मंगळावरला रात्री संदीप निमकर यांचा मारेकरी वीरेंद्र बोंतला (वय २१) मू. रामपुर यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असता त्यांची कसून चौकशी केली असता संदीप आणि विरेंद्र एकाच वार्डमध्ये राहत असून घटनेच्या दिवशी तिघेही दारू पिण्यासाठी गावालगतच्या जंगलात गेले त्याठिकाणी नशेत असताना संदीप व विरेंद्र यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली असता राग अनावर न झाल्याने काठी व दगडाने संदीपचा खून केल्याची कबुली दिली. यात त्यांच्या साथीला त्यांचे बंधू विष्णू बोंथला (वय २२) व संकेत उपरे (वय २५) राजुरा यांनी संदीपची हत्या करण्यासाठी मदत केल्याचे पोलिसांना सांगितले यांच्यावर भांदवी कलम ३०२, ४३, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राजुराचे पोलिस निरीक्षक योगेश्वर पारधी करीत आहे.

# जनता विद्यालय ताडाळी येथील माजी विद्यार्थिनीचे सुयश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जनता विद्यालय ताडाळी ( ता- जिल्हा चंद्रपूर) येथील माजी विद्यार्थिनी कु.दिव्या विजय गेडाम (वर्ग १० वा २०२२ -२३ गुण ८५टक्के ) हिने तमिळनाडू येथील कुग्लोर जिल्ह्यात राष्ट्रीय पातळीवर झालेल्या क्रीडा खेळांमध्ये लाठी- काठी या खेळात सिल्वर पदक भूषवले आहे .

यानंतर कन्याकुमारी येथे डिसेंबर २०२३ ला होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. तरी जनता विद्यालय ताडाळी तसेच ताडाळी गावाचे नाव उंचावले आहे. कु. दिव्याने या खेळामध्ये कमी वेळात प्राविण्य मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे .या निमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक बी.जी . जिवतोडे यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य वीज कंत्राटी कामगार संघाचे पदाधिकारी जाहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महावितरण विभागीय झोन अंतर्गत चंद्रपूर, बल्लारपूर व वरोरा उपविभागामध्ये रिक्त पदांवर कंत्राटी कामगार म्हणून तंत्रज्ञ व उपकेंद्र सहायक या पदावर कार्य करणारे तसेच नियमित कर्मचाऱ्याच्या खाद्य ला खांद्या लावून काम करणारे बाह्य स्त्रोत कंत्राटी कामगार यांची बैठक ९ ऑक्टोंबर रोज सोमवारला भारतीय मजदूर संघ चंद्रपूर कार्यालयात बैठक पर पडली . बैठकीला महाराष्ट्र राज्य वीज कंत्राटी कामगार संघाचे जिल्हा अध्यक्ष हेमराज गेडे यांचेसह भारतीय मजदूर संघ चंद्रपूरचे अध्यक्ष प्रमोद येलचलवार यांच्या उपस्थितीत चंद्रपूर सर्कल तसेच उपविभाग चे पदाधिकारी यांची पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली . यामध्ये चंद्रपूर सर्कल अध्यक्ष अंकुश डोंगरवार , वरोरा उपविभाग उपाध्यक्ष जितेंद्र काळे , मिथुन गायकवाड (बल्लारशाह) , भारत वराटकर (चंद्रपूर ) उपविभाग सचिव विकास डोंगरे (वरोरा) ,दिपक उमरगुंडावार (बल्लारशाह ) , उपविभाग सहसचिव दिलीप भगत (वरोरा ), नितीन महाकुलकर (बल्लारशाह), चंद्रपूर सर्कल संघटक सचिव स्वप्निल तराळे, सर्कल प्रसिद्धी प्रमुख सचिन पुसदेकर यांचेसह उपविभाग कार्यकारिणी सदस्य म्हणून महादेव सिडाम (वरोरा ), रमाकांत उरकुडे (बल्लारशाह) यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नवनिर्वाचित चंद्रपूर सर्कल अध्यक्ष यांनी संपूर्ण नवनिर्वाचित पदाधिकारी यांना पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या. यावेळी महावितरण विभात बाह्य स्त्रोत यंत्रचालक व तंत्रज्ञ बरेच संख्येने उपस्थित होते.




इयत्ता दहावीतील विद्यार्थी यश राहुल वाघमारे यांनी स्वत: मा. बाळासाहेब आंबेडकर यांचे चित्र रेखाटले व ती फ्रेम् बाळासाहेब आंबेडकर यांना देताना यश वाघमारे अजय सरवदे लखन जोगदंड

# तुला माहिती नाही, ते आतून सगळे एकच आहेत?:जयंत पाटलांनी पवारांपुढे मांडली कार्यकर्त्यांच्या मनातील शंका

**मुंबई**–राष्ट्रवादीत पडलेले दोन्ही गट आतून एकच आहेत का? अशी शंका कार्यकर्त्यांच्या मनात असल्याचेही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलून दाखवले. बऱ्याच जणांना अशी शंका आहे, हे परत एक झाले तर कशाला डोक्याला त्रास. अशी शंका प्रत्येक्याच्या मनात आहे का नाही? आम्ही सगळ्यांनीच शपथ घेतली पाहिजे की आम्ही एक होणार नाही म्हणून. एक दुसरीला म्हणते कशाला कळ काढा? हे आतून एकच आहेत. मी तुमच्या मनातले बोलायचा प्रयत्न करत आहे, पण तसे काहीही नाही. परतीचे दोर कापण्यात आले आहेत, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, लोक गेल्यामुळे संधी मिळाली आहे. जे पक्षातून गेले त्यांच्याबद्दल बोलू नये, आपल्याला कतृत्व करून दाखवायचे आहे. काम करा, महिलांची संख्या व्यापक करा, आपल्या मनावर घेतले कामाला लागलो, पूर्वीएवढाच मजबूत पक्ष करू. गेले ते गेले, आपण पुन्हा नव्याने सुरूवात करू. जिथे जागा रिकाम्या आहेत त्या पटकन भरा. आपल्याला तात्काळ कामाला लागून वेगवेगळी आंदोलने हातात घेऊन कामाला



लागले पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत.जयंत पाटील म्हणाले की, लोकांना नोकऱ्या हव्या आहेत, तर हे कंत्राटी पद्धतीने भरू पाहत आहेत. त्याला विरोध करा. मोकळ्या जागा भरा, पक्षांतर्गत बाबी पक्षाच्या चौकटीत मांडा. देशातील महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा होत नाही, बेकारीवर चर्चा होत नाही. जातनिहाय जनगणना व्हायला पाहिजे, ती होत नाही, तुम्ही महाराष्ट्रातल्या प्रत्येक गोष्टीसाठी रस्त्यावर उतरा, असे आव्हानही त्यांनी केले आहे.शरद पवार म्हणाले की, समाजात चुकीचे काही दिसले तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरु नका, सरकार बदलत असते, आपण त्या केसेस मागे घेतो असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना राजकारणात सक्रिय होण्यास सांगितले आहे. तर कुठे अन्याय होत असल्यास रस्त्यावर उतरत आक्रमक होण्यास सांगितले आहे.जयंत पाटील म्हणाले की, शरद पवार साहेब हुकूमशाह आहेत. ते त्यांच्या मनाने पक्ष चालवतात, अशी टीका होत आहे. मात्र आम्हाला असा अनुभव आला नाही. शरद पवार सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतात. तुमच्या कार्यशैलीवर जेव्हा आम्ही प्रश्न उपस्थित करु तेव्हा अवघड होईल, असा इशारा जयंत पाटील यांनी अजित पवार गटाला दिला.

# शाळा खासगी कंपन्यांना चालवण्यास देण्यास शरद पवारांचा विरोध

**मुंबई**–जिल्हा परिषदेची शाळा दत्तक घेतलेल्या एका कंपनीने शाळेत गौतमी पाटील यांचा कार्यक्रम ठेवल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. त्यांनी यासंबंधी सरकारी शाळा खासगी कंपन्यांना चालवण्यास देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर जोरदार हरकत घेतली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे मनमानी पद्धतीने काम करण्याचे प्रकार वाढतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

नाशिकची एक शाळा मद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीने दत्तक घेतली होती. त्यानंतर या कंपनीने शाळेत गौतमी पाटील यांच्या नृत्याचा कार्यक्रम ठेवला होता, असे शरद पवार बुधवारी राष्ट्रवादी महिला काँग्रेसने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना म्हणाले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, रोहिणी खडसे आदी नेते उपस्थित होते.दरम्यान शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, समाजात चुकीचे काही दिसले तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरु नका, सरकार बदलत असते, आपण त्या केसेस मागे घेतो असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना



राजकारणात सक्रिय होण्यास सांगितले आहे. तर कुठे अन्याय होत असल्यास रस्त्यावर उतरत आक्रमक होण्यास सांगितले आहे.शरद पवार यावेळी म्हणाले की, सरकार जिल्हा परिषदेच्या शाळा खासगी कंपन्यांना चालवण्यास देत आहे. या शाळा कंपन्यांच्या सीएसआर खात्यातून चालवण्यात याव्यात. या माध्यमातून शाळांचा विकास साधण्याचा सरकारचा मानस आहे. पण यामुळे एक वेगळाच धोका निर्माण होण्याची भीती आहे. यापुढे जी कंपनी शाळा दत्तक घेईल, त्या शाळेला कोणते नाव द्यायचे याचा पूर्ण अधिकार संबंधित कंपनीला असणार आहे. भविष्यात त्या कंपनीला शाळेच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा पूर्ण अधिकार असेल, असे शरद पवार म्हणाले.यामुळे शाळेची शासकीय मालमत्तेचा वापर वैयक्तिक कारणांसाठी होईल. याचे एक उत्तम उदाहरण सांगतो. नाशिकमधील एक शाळा मद्य तयार करणाऱ्या कंपनीने दत्तक घेतली आहे. त्या शाळेमध्ये नुकताच गौतमी पाटील यांच्या नृत्याचा कार्यक्रम घेतला गेला. आता असा आदर्श आम्ही मुलांसमोर ठेवणार आहोत? त्यामुळे सरकारी शाळा खासगी कंपनीला देण्याच्या सरकारच्या निर्णयाला सर्वांनीच विरोध केला पाहिजे, असेही शरद पवार यावेळी राज्य सरकारवर निशाणा साधताना म्हणाले.

# राज्य सरकारला जनतेचे काही देणे घेणे नाही : नाना पटोले

**मुंबई**–भाजप सरकार अत्याचारी आहे. सोयाबीनचे भाव कमी झाले आहेत. राज्यातील सरकार कॉमेडी शो सारखे आहे. इथल्या जनेतचे सरकारला काही देणेघेणे नाही. राज्यातील सरकार झोपी गेले आहे. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करत आहे .दुष्काळ जाहीर केला पाहिजे. पण तो होत नाही, शेतकरी अडचणीत आहे. सामान्य नागरिक महागाईने त्रस्त आहे. यावर सरकार काही करत नाही, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शिंदे सरकारवर निशाणा साधला आहे. दरम्यान नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, पाकिस्तानमध्ये ३०९ रुपयांत सिलेंडर विकत मिळतो. आपल्याकडे मात्र सिलेंडरच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला लुटल्या जात आहे. राज्य आणि केंद्रातील सरकार हुकुशाही सरकार आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये. मात्र शेतकऱ्यांच्या मालाला भाव न देण्याच पाप हे सरकार करत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शेतकऱ्यांनी टोमॅटो आणि कांदे फेकून मारले. महाराष्ट्रामध्ये सध्या परिस्थिती ही भयावह आहे. सरकार विरोधात आता काँग्रेस रस्त्यावर उतरणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसची भूमिका आहे की, जातिनिहाय ओबीसीची जनगणना झाली पाहिजे. सरकार उघडे पडू नये म्हणून ओबीसी जनगनना करत नाही. बहुमत आणण्यासाठी, सत्तेत येण्यासाठी खोक्यांनी



लोक जमा केले, असा आरोपही त्यांनी यावेळी केला आहे. सत्ता तुमच्या हातात आहे. मग जनगणना का करत नाही? देशात गरिबी निर्माण करण्याच काम पंतप्रधान मोदी सरकारने केल्याचेही त्यांनी म्हटले आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांना भाजप वॉशिंग मशीनमध्ये धुवून सत्तेत सहभागी करतात. लोकांचा आता यांच्यावर विश्वास नाही. त्यामुळे जनतेच्या काँग्रेसकडून अपेक्षा वाढल्या आहेत. नकली कार्यक्रम करण्याची गरज काँग्रेसला नाही. दिलेला शब्द पाळणारे नेते राहुल गांधी आहेत,

# शेतकऱ्यांच्या नावे बोगस कर्जे घेणाऱ्या भाजप नेत्याच्या साखर कारखान्याची ईडी चौकशी का नाही ?–राजू शेट्टी

**सोलापूर :** राज्यात बहुसंख्य साखर कारखादार स्वतःच्या स्वार्थासाठी आणि राजकीय संरक्षण मिळण्यासाठी सत्ताधारी भाजपच्या वळचणीला गेले आहेत. यात भाजपचेच असलेले माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या लोकमंगल साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या परस्पर त्यांच्या नावाने बँकांतून कर्ज घेतले जाते. त्यावर तक्रारी करूनही का कारवाई होत नाही. खरे तर याप्रकरणाची केंद्रीय सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) चौकशी करायला हवी. पण ही यंत्रणा राजकीय आश्रयाखाली असलेल्या मंडळींची चौकशी का करीत नाही, असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला आहे.

सोलापुरात बुधवारी प्रसार माध्यमांशी बोलताना शेट्टी यांनी ऊस एफआरपीसह शेतकऱ्यांशी संबंधित मुद्यांवर भाष्य केले. राज्यात सत्ताधारी भाजपच्या वळचणीला गेलेल्या प्रस्थापित साखर कारखानदारांनी स्वतःच्या



कारखान्यांसाठी शेकडो कोटींची कर्जे घेतली आहेत. त्यासाठी नियम खुंटीला टांगण्यात आले आहेत. अन्य साखर कारखानदारांना कर्ज देताना कडक नियम दाखविण्यात आले आहेत. जो कोणी साखर कारखानदार भाजपच्या आश्रयाखाली जाईल, त्यांच्यावर सवलतींचा वर्षाव होत असताना दुसरीकडे हेच साखर कारखानदार शेतक–यांची अडवणूक करीत आहेत. सोलापुरात माजी मंत्री सुभाष देशमुख यांच्या साखर कारखान्याने तर शेतक–यांच्या परस्पर त्यांच्या नावाने बँकांतून कर्जे उचलली आहेत. हा प्रकार सरळ सरळ फसवणुकीचा असताना बँका सुध्दा योग्य जबाबदारीने वागत नाहीत. एखादा शेतकरी कर्ज मिळण्यासाठी बँकेत गेला तर त्याला कायदे–नियम सांगितले जातात. किती तरी कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. परंतु येथे राजकीय नेत्यांच्या साखर कारखान्यांकडून शेतक–यांच्या परस्पर त्यांच्या नावाने बोगस कर्जे कशी दिली जातात ? याबद्दल संबंधित बँका आणि पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करूनही कारवाई का होत नाही, असा सवाल शेट्टी यांनी केला.

# तीर्थक्षेत्र तुळजापुरात कडकडीत बंद, दर्शन मंडप व विकास आराखड्याला स्थानिकांचा विरोध

**धाराशिव/तुळजापूर :** तुळजाभवानी देवीचा दर्शन मंडप आणि विकास आराखड्यावरून तुळजाभवानी भक्त विकास आराखडा कृती समितीने बुधवारी पुकारलेल्या बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. कुलस्वामिनी तुळजाभवानीचे तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजापूर शहरात दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. परिणामी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना बंदमुळे गैरसोयीला सामोरे जावे लागले.तुळजापूर शहरात तुळजाभवानी देवीचा दर्शन मंडप आणि मंदिर संस्थानची प्रशासकीय कार्यालय इमारत प्रस्तावित विकास आराखड्याप्रमाणे न करता, उंबरझरा या जागेत करण्यात यावी, अशी मागणी कृती समितीने लावून धरली आहे. या मागणीसाठी



बुधवारी कृती समितीने बंद पुकारला होता. या बंदमध्ये तुळजापूर शहरातील व्यापार्यांसह सर्व घटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. आपली दुकाने बंद ठेवून व्यापारी आणि व्यावसायिकांनी बंदला मोठा प्रतिसाद दिला. सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून पदयात्रा काढण्यात आली. राजे शहाजी महाद्वारासमोर या पदयात्रेची सांगता झाली. महाराष्ट्र सरकारमध्ये सहभागी असलेले लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांना सद्बुद्धी दे, असे साकडे तुळजाभवानी देवीकडे घालून महाद्वारासमोर महाआरती करण्यात आली.

# राजे विश्वेश्वरराव कला वाणीज्य महाविद्यालया मध्ये वन्यजीव संरक्षण सप्ताह साजरा

**भामरागड । प्रतिनिधी**

राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाव्दारे वन्यजीव संरक्षण सप्ताहचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी भूगोल विभागप्रमुख डॉ. कैलास व्हि निखाडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये आपला देश जैवविविधतेने नटलेला आहे. या जैवविविधतेतील वन्यजीव मानवी जीवनाचाही अविभाज्य घटक आहेत. या वन्यजीवांच्या परस्परसंबंधांविषयी निसर्गातल्या विविध घडामोडींमध्ये असलेल्या त्यांच्या सहभागाविषयी माहिती व्हावी त्या दृष्टीने जनजागृती व्हावी यासाठी १९५४ सालापासून दरवर्षी भारत सरकारच्या ष्नॅशनल बोर्ड ऑफ वाइल्डलाइफष् तर्फे २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर हा आठवडा भारतीय वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. असे सांगितले

याप्रसगी अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद घोनमोडे यांनी आपल्या अक्ष्यक्षीय भाषातुन विद्यार्थीयांना मार्गदर्शनातुण नामशेष होत चाललेल्या वन्य




पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. आता या मूळ हेतूचा काळानुसार विस्तार झाला आहे. भारतासहित जगातील इतरही पुरातन संस्कृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे मानव आणि वन्यजीवात मैत्री असणे ही संपूर्ण पृथ्वीची गरज आहे. कारण वन्यजीवांखेरीज मानव सुखाने राहूच शकणार नाही. ही जागृती रुजवण्यासाठी भारत सरकारने ष्इंडियन बोर्ड ऑफ वाईल्डलाईफ ची स्थापना पूर्वीच केली आहे. मानव.वन्यजीव संघर्ष कधी कधी गंभीर रूप धारण करतो. वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी अनेक कायदे आपल्याकडे आहेतही पण प्रश्न त्यांच्या काटेकोर अंमलबजावणीचा आहे त्या दृष्टीनेही जनजागृतीची गरज आहे. असे सांगितले तसेचे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संतोष डाखरे यांनी सुध्दा मार्गदर्शनातुन विद्यार्थी यांना सांगितले की भारतीय वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात जनजागृतीसाठी अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते काही स्वयंसेवी संस्था तसेच सरकारतर्फे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले जातातण् त्यांद्वारे वन्यजीवांचे महत्त्व तरुण पिढीच्या ध्यानात यावे आणि ते वन्यजीव संवर्धनासाठी अधिक सजग व्हावेत हा प्रयत्न असतो. तसेचे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश डोहणे यांनी सुध्दा मार्गदर्शनातुन विद्यार्थी यांना सांगितले की भामरागड वनअरण्यात वन्यजीवांची सख्या दिवसे ने दिवस कमी होत आहे त्यामुळे लोकामध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यक्रमाची प्रस्थावना साहिल पुंगाटी तसेच आभार प्रदर्शन कु. रोहणी पुंगाटी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बडुबोंडे व सर्व विद्यार्थीयांचे सहकार्य लाभले.

# महाआरोग्य शिबिराचा १२९१ रुग्णांनी घेतला लाभ

**गडचांदूर । प्रतिनिधी**

आ. सुभाष धोटे यांच्या वाढदिवसानिमित्त गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर, आ. सुभाष धोटे मित्रपरिवार व दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी ( मेघे ) यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी विद्यालय, गडचांदूर येथे महाआरोग्य शिबिर नुकतेच पार पडले. या शिबिरात १२९१ रुग्णांच्या आरोग्याची तपासणी केली. काही रुग्णांना पुढील उपचाराकरिता आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी ( मेघे ) येथे पाठविण्यात येणार आहे.

१२० रुग्णांनी कौटुंबिक आरोग्य कार्ड काढले. या कार्ड मध्ये कुटुंबातील सदस्यांना वर्षभरात मोफत तपासण्या करता येईल. शिबिराचे उद्घाटन आ.सुभाष धोटे यांनी केले. अध्यक्षस्थानी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष उत्तम पेचे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्ष नम्रता ठेमस्कर, नगराध्यक्ष सविता टेकाम, सीडीसीसी बँकचे संचालक विजयराव बावणे , कृ. उ. बा. स. सभापती अशोक बावणे, कोरपना च्या नगराध्यक्ष नंदा




बावणे, डॉ. मिखिलेश, प्राचार्य स्मिता चिताडे, संस्थेचे सचिव धनंजय गोरे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, प्राचार्य डॉ. देव, तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा आशा खासरे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शैलेश लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष देरकर, प्रास्ताविक सचिन भोयर यांनी केले.यावेळी ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट व्यंकटेश बालसनीवार, रउफ खान वजीर खान, गुलाबराव शेंन्द्रे, संजय रणदिवे, दिगांबर लांजेकर, अजय लांजेकर यांचे कडून वाटप करण्यात आले.

# भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते सभा मंडपाचे भूमिपूजन

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचगुंडी येथे माजी जिल्हा परीषद अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांच्या हस्ते सभा मंडप बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

चिंचगुंडी येथील नागरिकांना गावातील विविध सभा आयोजित करताना झाडाखाली किंव्हा इतरत्र बसून सभा घ्यावा लागत होता.गावात सभा मंडप झाल्यास ही समस्या दूर होणार म्हणून गावकऱ्यांनी भाग्यश्री आत्राम यांच्याकडे मागणी केली होती. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन भाग्यश्री आत्राम यांनी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना त्वरित सभा मंडप बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.अखेर आमदार निधीतून मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी ७ लाख ३८ हजार रुपये मंजूर केले आहे.निधी प्राप्त होताच




माजी जिल्हा परिषद अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी चिंचगुंडी येथील सभा मंडप बांधकामाचे भूमिपूजन केले.आता चिंचगुंडी वासीयांची अडचण दूर झाली असून गावातील नागरिकांनी ताईंचे आभार मानले आहे.या भूमिपूजन कार्यक्रमाला सरपंच कमला बापू आत्राम,तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार, नगरसेवक अमोल मुक्कावार, मखमुर शेख, रामू कस्तुरवार, बिच्चु मंचालावार, बापू गानालावार, शंकर बाकोलू, रामन्ना कस्तुरवार, तिरुपती पालेवार,राजू आत्राम, राजाराम कुमरे, राकेश गानालावार, विनोद देवरवार, गागुबाई कंपेलवार, हरीश येमुलवार आदी गावकरी उपस्थित होते.

# गोंडपिपरीत जनता महाविद्यालयात क्लास क्लीन कॉन्टेस्टचे आयोजन



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त जनता कनिष्ठ महाविद्यालय गोंडपिपरी येथे क्लास क्लीन कॉन्टेस्ट या शालेय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.आयोजित स्पर्धा दि.(५) ऑक्टोबर ते (७) ऑक्टोबर या दरम्यान पार पडली .यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व वर्गशिक्षक यांनी खूप उत्साह, जिद्द,व चिकाटीने या स्पर्धेत भाग घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये जन्मजात उपजत सुप्त गुण असतात व त्या उपजत गुणांचा विकास अशा शालेय उपक्रमाच्या माध्यमातून करता येतो.यासाठी सदर उपक्रमाचे महत्त्व आहे. स्वच्छता ही सेवा है ,गंधगी जान लेवा है या म्हणी प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी तन, मन ,धनाने सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी आपला स्वतःचा वर्ग स्वच्छ करून वेगवेगळ्या म्हणी, पोस्टर्स,शालेय चित्र, इत्यादीनी वर्ग सजावटी साठी प्रयत्न केले .वर्ग सजावट ,उदबोधक सुविचार, रंगसंगती ,मूखद्वार रांगोळी व स्वच्छता या मुद्द्यांवर सदर स्पर्धा घेण्यात आली.सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वर्ग बारावी अ ,ब कला शाखा,द्वितीय वर्ग बारावी ड विज्ञान शाखा व तृतीय क्रमांक वर्ग बारावी विज्ञान शाखा या वर्गाने पटकाविला.उर्वरित सर्व वर्गांना प्रोत्साहन पर भेटवस्तू व पारितोषिक देण्यात आले .याप्रसंगी पर्यवेक्षक म्हणून प्राचार्य जांभुळकर,प्रा चौधरी,ठमके,प्रा बांदुरकर, प्रा. कोकाटे,प्रा नागपुरे, प्रा भोयर, प्रा बोबडे,प्रा तितरमारे, प्रा विरेशम्म,प्रा विरुटकर, पिंपलकर,प्रा.काळे,प्रा. बेजलवार ,प्रा.जीवतोडे, प्रा साठे इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले .कार्यक्रमाचे संचालन प्रा. नारनवरे सांस्कृतिक प्रमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रा मोरे यांनी केले.

# ग्रामगीता महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी सभेचे आयोजन



**चिमूर । प्रतिनिधी**

ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथे १० ऑक्टोंबर रोज मंगळवार ला माजी विद्यार्थी सभेचे आयोजन करण्यात आले .सभेमध्ये मोठ्या संख्येने माजी विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव तसेच महाविद्यालयाविषयीचे आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील माजी विद्यार्थी योगेश मेश्राम या विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट कार्यासाठी सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अमीर धमानी तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आई.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. निलेश ठवकर, प्रा. नागेश ढोरे, माजी विद्यार्थी सचिन भरडे आणि जयराम वावरे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी महाविद्यालयात केलेल्या नवनवीन उपक्रमाबद्दल , विकास कार्याबद्दल माहिती दिली,तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी विभाग समन्वयक प्रा. समीर भेलावे यांनी तर प्रास्ताविक प्रा. नागेश ढोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# आनंद निकेतन महाविद्यालयात आर्टिफिशियल इंटेलिजन्स वर कार्यशाळा



**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कनिष्ठ महाविद्यालय आणि सेंट पलोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि टेक्नॉलॉजी ,नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद निकेतन महाविद्यालययात वर्ग बारावीचे विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक १० ऑक्टोबर ला करण्यात आले . या कार्यशाळेत विज्ञान शाखेच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आर्टिफिशियल इंटेलिजन्स बद्दल विद्यार्थ्यांना पालोटी कॉलेजचे प्राध्यापक रांगणकर सर व प्राध्यापक सचिन नागमोते सर यांनी मार्गदर्शन केले मार्गदर्शन केले .त्यानंतर विद्यार्थ्यांची डिझाईनिंग वर एक परीक्षा घेण्यात आली .त्यात ज्या विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली त्यांना उत्कृष्टता सर्टिफिकेट देण्यात आले आणि इतर सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.काळे व उपप्राचार्य राधा सवाणे यांच्या हस्ते सर्टिफिकेट देण्यात आले या कार्य शाळेच्याआयोजनाकरिता प्राध्यापक मंडल व इतर सहकारी प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

# अभिलाशा गणेश मंडळाची समाज परिवर्तनाकडे वाटचाल



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

सध्या स्थितीत काही गणेश मंडळाकडे सामाजिक जाणिवेचा अभाव म्हणून पाहल्या जाते.परंतु त्यातीलच काही मंडळे आता समाज परिवर्तनाच्या मार्गावर काम करत असल्याचे आशावादी चित्र अनेक गावांत पाहायला मिळत आहे.वढोली येथील अभिलाषा मंडळातर्फे मस्कऱ्या हाडपोक गणेश उत्सव साजरी करण्याची परंपरा दहा वर्षांपासून सुरू आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा शिक्षणाविषयी त्यांच्यात आवड निर्माण व्हावी,आत्मविश्वास निर्माण व्हावा या उदात्त हेतूने सामाजिक भान ठेवत मंडळाने आज दि.(११) बुधवारी सरस्वती विद्यालयात विविध विषयावर निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.वक्तृत्व स्पर्धेत भारती चनकापुरे,क्षितिजा शेडमाके,खुशी गुंडावार तर निबंध स्पर्धेत साक्षी पिंपळशेंडे,क्षितिजा शेडमाके,वैशाली मडावी यांनी सुयश प्राप्त केले.मंडळातर्फे यांना शालेय साहित्य व रोख रक्कमसह शिल्ड देऊन सन्मान करण्यात आला.सोबतच सहभागी सर्व स्पर्धकांना विशेष प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.यावेळी मुख्यध्यापक चोखारे, रामटेके, आवडे,चौधरी, विनोद शेडमाके या शिक्षकांसह,सुरज माडुरवार, अजित कोहपरे,गोकुळ सोनटक्के,शैलेश चौधरी,क्रीष्णा सोनटक्के,उमेश उपासे,अक्षय भोयर,प्रतीक तांगडे यांची व मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती होती उपस्थिती होती.

# बापरे ! केवढा मोठा साप !

## सर्पमित्र यांनी पकडला साप



**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील भिसी पासून तीन कि .मी. अंतरावरील पुयारदंड येथे . १० ऑक्टोबर ला विठ्ठल वटाणे यांच्या शेतात अजगर साप आढळून आला. सध्या सोयाबीन या पिकाची कापणी सुरू आहे. शेतमजूर महिला ह्या सोयाबीन पीक कापणी करीत होत्या. तेव्हा शेतीच्या बांधावर मजुरांना अजगर हा साप दिसला. तेव्हा उपस्थित अतुल गावंडे यांनी सर्पमित्र सोहेल शेख, शंकरपूर यांना फोन करून बोलाविले. त्यांनी आल्यानंतर लगेच साप पकडला आणि फॉरेस्ट विभाग, शंकरपूर येथे नोंद करून जंगलात सोडण्यात आला. यावेळी सर्पमित्र सोहेल शेख, साहिल शेख, अभिषेक चंदणखेडे, वन्य प्राणी प्रेमी समीर बल्की, ऋषी राऊत, अतुल गावंडे, हर्षल वटाणे, तसेच नागरिक उपस्थित होते.

# गुंतवणूक,वृध्दी,निर्यात व एक जिल्हा एक उत्पादन बाबत इग्नाईट महाराष्ट्र कार्यशाळेचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

उद्योग व उद्यमशिलता विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ अधिकाधिक उद्योजकांना मिळावा व जिल्हयातील निर्यातक्षम उद्योग निर्माण व्हावे यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, एम.सी.ई.डी.सिडबी, आयडीबीआय कॅपिटल्स यांच्या संयुक्त विद्यमाने होटेल लॅन्डमार्क, येथे गुंतवणूक, वृध्दी, निर्यात व एक जिल्हा एक उत्पादन यावर सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमावर इग्नाईट महाराष्ट्र कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उदघाटन अति.जिल्हाधिकारी धनाजी पाटील यांचे हस्ते करण्यात आले. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड उपस्थित होते.



सर्वप्रथम अति.जिल्हाधिकारी, धनाजी पाटील यांनी जिल्हयातील उद्योगांना, नव उद्योजकांना, शेतकरी सहकारी संस्था व जिल्हयाच्या विकासात्मकदृष्टीने कसा भर देता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेस आशिष मुनघाटे-व्यवस्थापक सिडबी यांनी सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगासाठी सिडबी अंतर्गत असलेल्या योजनांची माहिती दिली. जी.बी.लाडे-उद्योग उपसंचालक, मुंबई यांनी मैत्री पोर्टल व मैत्री कायद्याबध्दल माहिती दिली. मैत्री कायद्या अंतर्गत एक खिडकी योजने अंतर्गत एकाच ठिकाणी उद्योग व्यवसायीकांना विविध विभागाच्या परवानगी मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले. उमेश रनोलीया-वरिष्ठ कार्यकारी यांनी आयडीबीआय कॅपीटल बध्दल मार्गदर्शन केले. सीपेटचे कार्तिक यांनी प्लॉस्टीकचे पूर्नवापर करुन वेगवेगळया वस्तू निर्माण करण्याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. मनिष गणविर यांनी बार्टी अंतर्गत घेण्यात येणा-या प्रशिक्षणाबध्दल सविस्तर माहिती दिली. पंकज कामडी-मार्केटींग एक्झीकेटीव्ह इंडिया पोस्ट डाकघर निर्यात केंद्राबध्दल माहिती दिली. युवराज टेंभूर्णे- जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थाक यांनी एमएसएमई योजना व कर्ज प्रकरणाबातची माहिती दिली. कृषि अधिक्षक, बस्वराज मास्तोळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेस आरसेटीचे कैलास बोनगीरवार, माविमचे सचिन देवतळे, कौशल्य विकास विभागाचे, शेन्डे , भास्कर मेश्राम हे उपस्थित होते. जिल्हयातील लघु उद्योगांना चालना मिळावी व निर्यातक्षम उद्योग निर्माण व्हावे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेत १५० हून अधिक उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्यागिक समुह, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक सदर कार्यशाळेत उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .